# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.11.2025** **वार- बुधवार**

---

**गुरुनानक**

शीख धर्मियांचे पहिले गुरू, गुरुनानक देवजी यांची जयंती आज पुणे शहरातही अतिशय उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात येत आहे. पुणे शहरातील गणेश पेठेतील गुरुद्वारा श्री गुरु सिंग सभा तसंच कॅम्पमधील गुरुद्वारा श्री गुरुनानक दरबार आणि पुणे शहरातील तसंच देहू रोड, पिंपरी चिंचवडमधील गुरुद्वारांमध्ये आज सकाळपासूनच गुरु ग्रंथ साहिबचं दर्शन घेण्यासाठी असंख्य नागरिक आवर्जून जात आहेत. भजन-कीर्तनांचं आयोजन करण्यात आलं असून हजारो नागरिकांनी लंगरचाही लाभ घेतला.

**त्रिपुरारी**

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आज पुण्यातील पर्वतीवरील श्री कार्तिक स्वामींच्या मंदिरात दर्शनासाठी मध्यरात्रीपासूनच नागरिकांनी भेट दिली. पुण्यातील हे एकमेव मंदिर दरवर्षी त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी दर्शनासाठी उघडण्यात येतं. शहरातील महादेवाच्या मंदिरांमध्येही त्रिपुर लावून भाविक दर्शन घेत आहेत. विविध मंडळांमार्फत त्रिपुरासुराचा वध हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**आचार संहिता**

नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकींसाठी राज्यात कालपासून आचारसंहिता लागू झाली आहे. पण ही आचारसंहिता पुणे महापालिकेला लागू होणार नाही असं महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केलं आहे.

**माझे अस्तित्व**

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीनं एकल महिलांसाठी 'माझे अस्तित्व' हा विशेष प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत एकल महिलांना सातबारा, घरपट्टी आणि घरकुलाच्या कागदपत्रांवर नाव नोंदविणं, शिधापत्रिका, आधार, आयुष्यमान भारत कार्ड आदी आवश्यक कागदपत्रं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी विशेष शिबिरांचं आयोजनही करण्यात आलं आहे. जिल्हा परिषदेनं केलेल्या सर्वेक्षणामध्ये 28 हजार 761 एकल महिलांना आरोग्य तपासणी आणि मोफत उपचाराची गरज असल्याचं आढळून आलं आहे. तसंच हक्काचा निवारा, कृषी आधारित आणि कृषीपूरक व्यवसाय आणि मुलांच्या शिक्षणासाठी या महिलांना मदतीची गरज आहे.

**108 रुग्णवाहिका**

महात्मा फुले जन आरोग्य योजनेसह सरकारी योजना राबवणाऱ्या खासगी आणि धर्मादाय रुग्णालयांमध्ये 108 रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारच्या आरोग्य विभागाकडून पावलं उचलण्यात आली आहेत. आपत्कालीन स्थितीत रुग्णानं विनंती केली तर जवळच्या खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांना दाखल केलं जातं. परंतु, खासगी रुग्णालयामध्ये दाखल असलेल्या रुग्णाला दुसऱ्या खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यासाठी ही सुविधा देण्यात येत नाही. तसंच काही रुग्णांना खासगी रुग्णालयांत उपचार घेण्याची इच्छा असते. यामुळे महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि सरकारी योजना लागू असलेल्या रुग्णालयांतही सुविधा सुरू करण्याचा विचार आरोग्य विभागाकडून केला जात आहे.

**कार्तिकी**

कार्तिकी वारी काळात येणाऱ्या भाविकांसाठी आळंदी देवस्थान, वतीनं दर्शनबारीतील भाविकांना 24 तास चहा, खिचडी प्रसाद, पाणी याची मोफत सेवा 12 नोव्हेंबरपासून देण्यात येणार आहे. संपूर्ण दर्शन मंडपात विद्युत व्यवस्था आणि सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्यात येणार आहेत. भाविकांचं आरोग्य आणि सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येईल असं देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ यांनी सांगितलं.

**पुरस्कार**

रुपवेध प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र कल्चरल सेंटर यांच्यातर्फे देण्यात येणारा तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार यंदा तामिळनाडूमधील रंगकर्मी दुष्यंत गुणशेखर यांना जाहीर झाला आहे. 16 नोव्हेंबरला पुण्यात हा पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शक डॉक्टर अभिलाष पिल्लई यांच्या हस्ते दिला जाणार आहे. पुरस्काराचं हे 18 वं वर्ष आहे.

**समाज**

समाजानं दिलेलं समाजालाच परत देण्यातून मानसिक समाधान लाभतं असं मत क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी पुण्यात व्यक्त केलं. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त फाउंडेशनच्या वतीने विविध संस्थांना उपयुक्त वस्तू भेट देण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. समाजसेविका सीमा दाबके यांनी दिव्यांग संस्थांमधील समन्वयाचं कार्य पुढे नेण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला. तर, या उपक्रमातून समाजसेवेची प्रेरणा आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याचं माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांनी नमूद केलं.

**वंदे मातरम्**

आर्ट इंडिया फाउंडेशन, वंदे मातरम् सार्ध शती जयंती समारोह समितीतर्फे 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या 150 वर्षांच्या निमित्तानं आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेतील बक्षिसपात्र आणि निवडक 180 कलाकृतींचं प्रदर्शन 9 ते 11 नोव्हेंबर या कालावधीत बालगंधर्व कलादालनात भरविण्यात येणार आहे. संयोजक, मिलिंद सबनीस यांनी ही माहिती दिली. प्रदर्शन सकाळी 11 ते सायंकाळी 7 या वेळेत सर्वांसाठी खुलं असणार आहे.

**खासदार**

केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारानं पुण्यात सुरु असलेल्या खासदार क्रीडा महोत्सवात आज योगासन स्पर्धा पार पडल्या. श्रावणी रासकर, अरविंद सबावत यांनी दुहेरी मुकुट मिळवला. पारंपरिक गटात आदित्य शितोळे आणि नीरल वाडेकर आणि आर्टिस्टिक गटात अबीर जोशी-निधीश तरळकेर विजेते ठरले.

**क्लायंबर**

पुण्यातील तेरा वर्षांच्या ध्रुवी पडवळनं IFSC Asian Kids Climbing Championship मध्ये 13 वर्षांखालील मुलींच्या गटात स्पीड क्लायम्बिंग या प्रकारामध्ये सुवर्णपदक जिंकलं. या स्पर्धेत 13 देशांतील 200 पेक्षा जास्त खेळाडू सहभागी होते.

**कुस्ती**

भारतीय शैली कुस्ती महासंघाच्या वतीनं हिंदकेसरी कुस्ती स्पर्धा तसंच महिला आणि पुरुष गटाच्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा सातारा इथं होणार आहे. यासाठी महाराष्ट्र संघाची निवड चाचणी नऊ नोव्हेंबरला पुण्यात होणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**